



# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २५६, शुक्रवार २८ जुन २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# खासदार लंकेंच्या खांद्यावर मंत्री गडकरींचा हात!



■ संसद भवन परिसरात मंत्री नितीन गडकरी यांची व खा. नीलेश लंके यांची भेट झाल्यानंतर गडकरी यांनी आपुलकीने जवळ घेउन त्यांच्या खांद्यावर हात ठेवत मतदारसंघातील कामांसाठी झुकते माप देण्याची ग्वाही दिली.

## ■ संसद परिसरात भेट ■ गडकरी यांच्याकडे पाहून समाजसेवेची उर्जा मिळते : लंके

नवी दिल्ली : विशेष प्रतिनिधी

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व खासदार नीलेश लंके यांची बुधवारी संसद परिसरात भेट झाल्यानंतर गडकरी यांनी लंके यांना आपुलकीने जवळ घेत आस्थेने विचारपुस केली. त्यांच्या खांद्यावर हात ठेऊन मतदारसंघातील कामांसाठी आपण सदैव पाठीशी असल्याचा संदेशही दिला. दरम्यान, गडकरी यांना पाहून समाजसेवेची उर्जा मिळते अशा भावना लंके यांनी यावेळी व्यक्त केल्या.**

सन २०१९ मध्ये विधासभा सदस्य म्हणून महाराष्ट्र विधीमंडळात काम करण्यास सुरूवात केल्यानंतर नीलेश लंके यांनी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या माध्यमातून मंत्री नितिन गडकरी यांची अनेकदा भेट घेतली होती. कोरोना काळात लंके यांनी केलेल्या कामगिरीमुळे प्रकाश झोतामध्ये आलेल्या लंके यांच्याविषयी स्वतः गडकरी यांनाही आकर्षण होतेच. लंके यांच्या कामाचे त्यांनी दिलदारपणे कौतुकही केले होते. हजारे यांच्या माध्यमातून भेट झाल्यानंतर गडकरी व लंके यांच्यात जवळीक निर्माण झाली. अनेकदा त्यांनी मतदारसंघातील कामांसाठी गडकरी यांच्या भेटीही घेतल्या. काही कामे मार्गी लागली, मात्र लंके हे संसद सदस्य नसल्याने कामे करून घेण्यात त्यांना मर्यादा येत होत्या. आता मात्र लंके हे संसद सदस्य झाल्यामुळे मंत्री गडकरी यांच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या आखत्यारीतील कामे मार्गी लावून घेण्यात लंके यांना अडचण येणार नाही.

### आणि पाथर्डी रस्त्याचे काम सुरू झाले

अहमदनगर, पाथर्डी, नांदेड, निर्मल तसेच अहमदनगर, राहुरी, शिर्डी कोपरगांव या रस्त्यांचे रखडलेले काम तात्काळ सुरु करण्यासाठी नीलेश लंके हे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसले होते. स्थानिक प्रशासनाकडून लंके यांच्या आंदोलनाकडे साफ दुर्लक्ष करण्यात आल्यानंतर अजित पवार हे लंके यांच्या भेटीसाठी नगर येथे आले होते. पवार यांनी थेट नितीन गडकरी यांच्याशी संपर्क करून रत्यांची दुर्दशा, रस्त्याच्या दुरावस्थेमुळे अपघात होउन गेलेले बळी याबाबत माहीती दिली. गडकरी यांनी त्यावेळी लंके यांच्याशीही चर्चा केली. त्यानंतर बांधकाम विभागाच्या अभियंत्यांना सुचना देत गडकरी यांनी हे काम तात्काळ सुरु करण्याच्या सुचना दिल्या होत्या. गडकरी यांच्या सुचनेनुसार त्याच दिवशी या कामास सुरूवात झाली आणि लंके यांचे उपोषण गडकरी यांच्या तत्परतेने सुटले होते.

### गडकरींच्या हस्ते पुरस्कार हे भाग्य

लोकमत वृत्तसमुहाने लंके यांना कोरोना काळात केलेल्या कामाबद्दल नितीन गडकरी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केला होता. त्यावेळी बोलताना लंके म्हणाले होते की, लोकमतने मला कोरोना काळात केलेल्या कामाबद्दल पुरस्कार दिला. हा पुरस्कार नितीन गडकरी यांच्या हस्ते दिला हे माझे भाग्य आहे. ज्या माणसाने गाव, शहर, राज्या-राज्यांमध्ये रस्त्यांचं जाळं उभे केले त्यांच्या हस्ते पुरस्कार घेताना मला आनंद होत असल्याच्या भावना लंके यांनी व्यक्त केल्या होत्या.

### गडकरींकडे पाहून उर्जा मिळते

देशाच्या रस्ते उभारणीत ज्यांचे बहुमुल्य योगदान आहे असे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची आज संसद भवन परिसरात भेट झाली. नेहमीप्रमाणे त्यांनी आपुलकीने जवळ घेऊन आस्थेने विचारपूस केली. दिलखुलासपणे संवाद साधला. ज्यांच्याकडे पाहून समाजसेवेची उर्जा मिळते.

खासदार नीलेश लंके

# एका पदापुरते विखे कुटुंब मर्यादित नाही !

## ■ पराभव म्हणजे फार आभाळ कोसळलंय असं नाही ! ■ लोकसभा निवडणूकीतील पराभवानंतर मा. खा. डॉ. सुजय विखे यांची प्रतिक्रिया



■ मा. खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी शिर्डी येथे भेट देऊन परीसरातील समस्या दोन महिन्यात दुर करण्याची ग्वाही दिली.

शिर्डी : प्रतिनिधी

**निवडणूका होतच असतात, त्यात जय पराजय सुरूच असतात. हा काही पहिला पराजय नाही. नगरपालिकेमध्ये, ग्रामपंचायतीमध्ये पराभव होतो.तिथे कार्यकर्ता पराभूत होतो. मी या मताचा आहे की कार्यकर्ता पराभूत झाला म्हणजे नेता पराभूत झाला. नगरपालिकेत कार्यकर्ता पडला याचा अर्थ तो नेताच पडला असा होतो. लोकसभा निवडणूकीतील पराभव हा काही ऐवढा मोठा विषय नाही की फार आभाळ कोसळलंय असं काही नसल्याचे सांगत मा. खा. डॉ. सुजय विखे यांनी लोकसभा निवडणूकीतील पराभवावर भाष्य केले. दरम्यान, एका पदापुरते विखे कुटुंब मर्यादित नाही असेही ते म्हणाले.**

खा. डॉ. सुजय विखे यांनी त्यांची मुलगी अनिशा हिच्या वाढदिवसनिमित्त स्पर्धा परीक्षा देणाऱ्या गरीब कुटूंबातील विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार प्रशिक्षण देण्यासाठी स्व. सिंधूताई विखे पाटील यांच्या नावाने योजना सुरू करण्याची घोषणा शिर्डी येथे केली. यावेळी त्यांनी परिसरातील प्रश्न समजावून घेतले. या प्रसंगी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

डॉ. विखे म्हणाले, लहानपणापासून मी शिर्डी परिसरातच वाढलो असून हे माझे घर आहे. मागच्या काही कालवधीमध्ये व्यस्त असल्याने या परिसरात येऊ शकत नव्हतो. आज येथे आल्यानंतर घरी आल्यासारखे वाटले. या भागातील जे काही प्रश्न असतील ते घरातले असून ते घराचा प्रमुखच सोडवतो. प्रमुख या नात्याने या भागातील सर्व प्रश्न दोन महिन्यात सोडविले जातील. त्याला फारसा कालावधी लागणार नाही अशी ग्वाही डॉ. विखे यांनी दिली.

### स्व. सिंधूताई विखे पाटील यांच्या नावाने योजना

गोर गरीब कुटूंबातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी उतरतात ते इतर ठिकाणी क्लासेसची फी भरू शकत नाहीत. अशा विद्यार्थ्यांसाठी त्याच दर्जाचे प्रशिक्षण मिळाले पाहिजे या दृष्टीकोनातून सिंधूताई विखे पाटील यांच्या नावाने नवी योजना सुरु करणार आहोत. त्याची घोषणा माझ्या मुलीच्या वाढदिवसानिमित्त केली.

मा. खा. डॉ. सुजय विखे पाटील

### विकासाला प्रतिसाद मिळाला नाही

विकास करत राहणे हे विखे परिवाराचे धोरण राहिलेले आहे. दुर्दैवाने विकासाला म्हणावा तेवढा प्रतिसाद मिळाला नाही. विकास करूनही अपयश पदरी पडलं, पण ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. जनता बरोबर असते तरीही उतार चढाव निर्माण होतात, त्याला बरोबर घेऊन पुढे जावे लागते असे डॉ विखे यांनी सांगितले.

### माझं सांत्वन करण्याचं कारण नाही

पराभव झाल्यावर सरपंचाचं सांत्वन करायला जसं कोणी जात नाही, नगरसेवकाचं सांत्वन करायला कोणी जात नाही तसंच माझंही सांत्वन करायला कोणी जाण्याचं कारण नाही. ते पडल्यावर पळायला लागतात मी पडल्यावर पळायला लागलो असल्याचे सांगत मा. खा. डॉ. सुजय विखे यांनी आपण पराभवानंतर पुन्हा कामाला सुरूवात केल्याचे स्पष्ट केले.

### एका पदापुरते विखे कुटूंब मर्यादीत नाही

एका पदापुरते विखे कुटूंब मर्यादीत नाही. मुळात मी राजकीय प्रक्रियेतला माणूसच नव्हतो. राजकारणात आलो, लोकांनी खासदार केले. पाच वर्षे प्रामाणिक काम केलं. आज लोकांनी त्या ठिकाणी मला नसेल स्विकारलं तर परत लढत राहू यापेक्षा काहीतरी बाबांच्या मनामध्ये चांगले काहीतरी असेल. हे धरून पुढे जायचं आहे.

मा. खा. डॉ. सुजय विखे पाटील

# टक्केवारी सरकार, चोर सरकार !

## ■ विरोधकांच्या घोषणांनी विधानभवन परिसर दणाणला ■ उद्धव ठाकरे येताच पेढे वाटप



मुंबई : प्रतिनिधी

**अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधक आक्रमक झाले आहेत. विरोधकांनी आज विधान भवनाच्या पायऱ्यांवर जमा होऊन जोरदार घोषणाबाजी केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून विरोधकांनी विधानसभेच्या पायऱ्यावर प्रचंड गोंधळ घातला. टक्केवारी सरकार, चोर सरकार अशा घोषणा देत विरोधकांनी जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे संपूर्ण परिसर दणाणून गेला. विरोधकांनी विधान भवनाच्या पायऱ्यावर गोंधळ घालून अधिवेशनात सरकारला कसं आणि किती धारेवर धरलं जाईल याचे संकेतच दिले आहेत.**

पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विधिमंडळ परिसरात विरोधक शेतकरी प्रश्नावर आक्रमक झाले. विरोधी पक्षाच्या आमदारांनी आंदोलन करत ‘ शेतकरी विरोधी महायुती सरकारच्या धिक्कार असो’ म्हणत सरकारच्या विरोधात जोरदार निदर्शने केली. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वात महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधान भवनाच्या पायऱ्यांवर जोरदार निदर्शने केले. यावेळी अनिल देशमुख आणि भाई जगतापही उपस्थित होते.

**वीज बिल माफ करा**

शेतकऱ्यांची वीज बिल माफ केली पाहिजे, शेतकऱ्यांची कर्जमाफी झालीच पाहिजे, कृषिमंत्र्यांच्या जिल्ह्यात बळीराजाचा बळी, कोरडा डोळा कोरडी विहीर दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना कोण देणार धीर, शेतकरी विरोधी महायुती सरकारचा धिक्कार असो, शेतकरी उपाशी महायुती सरकार तुपाशी, अशा विविध उर्वरीत पान ३ वर

# नगरच्या आयुक्तांवर ८ लाखांची लाच मागितल्याप्रकरणी धाड

## ■ एसीबीची कुणकुण लागताच आयुक्तांसह लिपीक फरार ■ राहते घर केले सील

नगर : प्रतिनिधी



**अहमदनगर महानगरपालिका आयुक्त डॉ. पंकज जावळे यांच्यावर छत्रपती संभाजीनगर लाचलुचपत विरोधी विभागाने मोठी कारवाई केली आहे. एसीबीच्या वतीने त्यांचे राहते घर सील करण्यात आले आहे. लिपिक शेखर देशपांडे याच्यामार्फत त्यांनी लाचेची मागणी केली होती. दरम्यान, एसीबीच्या कारवाईची माहिती मिळताच आयुक्तसह लिपिकाने पळ काढला आहे. या प्रकरणात आयुक्त डॉ. पंकज जावळे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, बांधकाम परवानगी देण्यासाठी अहमदनगर पालिका आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी ८ लाखांची लाच मागितल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. एता कन्स्ट्रक्शन फर्मच्या बांधकामासाठी हा परवाना पाहिजे होता. १९ आणि २० जून रोजी ही रक्कम अहमदनगर पालिका लिपिक शेखर देशपांडे यांच्यामार्फत ही मागणी करण्यात आली होती. त्यानंतर या प्रकरणाची एसीबीकडे तक्रार गेल्यानंतर एसीबीने कारवाई सुरू केली. एसीबीच्या कारवाईची कुणकुण लागल्यानंतर पालिका आयुक्त आणि लिपिक हे दोघेही सध्या फरार झालेले आहेत.

दरम्यान, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वतीने या प्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लिपिक शेखर देशपांडेच्या बुऱ्हाण नगरमधील घरावर एसीबीकडून छापा टाकण्यात आला आहे. तर आयुक्ताचं राहतं घर लाचलुचपत विभागाने सील केले आहे.









# प्रगतीमंत्र

# एंटरटेनमेंट इंडस्ट्रीतील धडपड !

**गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या देशात एंटरटेनमेंट इंडस्ट्री अर्थात मनोरंजन क्षेत्रात झपाट्याने वाढ होत आहे. यातील चित्रपट, नाटक, जाहिरात, मालिका अशा विविध क्षेत्रात अनेक कलाकार आपलं नशीब आजमवण्यासाठी धडपडतात.**

### ‘ही’ कौशल्य हवी

- कोणताही कलाकार एका रात्रीत यशस्वी होत नाही. क्वचितच एखाद्या छोट्या प्रॉडक्शनमध्ये गेल्यानंतर एखादा स्टार बनतो. परंतु या क्षेत्रात येण्यासाठी ही कौशल्य विकसित केली पाहिजेत.
- वाचन क्षमता वाढवा.
- कोणतेही पात्राच्या प्रेरणा आणि भावना अस्सल आणि मनोरंजक पद्धतीने चित्रित करणे आवश्यक आहे.
- अभिनय तंत्राच्या श्रेणीची समजून घ्या.
- दिलेल्या सूचनांचे पालन करत इतरांसह काम करण्याची क्षमता ठेवा.
- भूमिकेला जिवंत करण्यासाठी पात्राचे व्यक्तिमत्व आणि परिस्थिती यांचे संशोधन करा.
- कलाकाराने एखादे वाद्य कसे वाजवायचे किंवा एखाद्या भागासाठी स्टेज फायटिंग सिक्वेन्स कसे करावे हे शिकले पाहिजे.



चित्रपटासह या क्षेत्राशी निगडित अभिनय, दिग्दर्शन, पटकथा लेखन, सिनेमॅटोग्राफी, संकलन, ध्वनी, संगीत, नृत्य दिग्दर्शन, ग्राफिक्स आदी वेगवेगळ्या विभागांमध्ये करियर करण्याच्या उत्तम संधी उपलब्ध झाल्या आहेत. यात अभिनय क्षेत्रात अनेक कलाकार अभिनेत्री आणि अभिनेता बनण्यासाठी मेहनत घेत असतात. पण ऑडिशनमध्ये अभिनयातील स्वतःच वेगळेपण दाखवत हजारो कलाकारांशी स्पर्धा करत पुढे जावे लागते. या स्पर्धेत नंबर लागला तर स्टार नाही तर एका छोट्या रोलवर समाधान मानावे लागते. त्यामुळे अभिनय हे खूप स्पर्धात्मक क्षेत्र आहे. अनेक नकार पचवत, कमी मानधनात, अवेळी केव्हाही काम करण्याची मानसिकता ठेवावी लागते. तरीही अनेकांना अभिनय क्षेत्रात अभिनेत्री किंवा अभिनेता म्हणूनचं करियर करण्याची इच्छा असते, परंतु योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने बहुतांश जण खूप धडपड करत राहतात. त्यामुळे सुरुवातीला या क्षेत्रात ऑडिशन देण्यापासून ते कॅमेऱ्यासमोर येईपर्यंत कोणत्या गोष्टींची आवश्यकता असते, किती मानधन मिळते आणि यातून पुढे करियरच्या काय संभाव्य संधी असतात जाणून घेऊ...

## कामाच्या संधी अन् मानधन...

२६ टक्के अभिनेते स्वःनियोजित आहेत आणि १३ टक्के थिएटर कंपनीसाठी काम करतात. अनेक जण वेगवेगळ्या मोठ्या प्रोजेक्टमध्ये काम करतात. काही छोट्या असाइनमेंटवर काम करतात. पण अभिनेत्याने सतत त्यांची पुढचं काम शोधत राहिलं पाहिजे. कारण एक असाइनमेंट एक दिवस असू शकेल तर दुसरी काही महिने असू शकते. तुम्ही सातत्याने कोणत्या जाहिराती, मालिकांमध्ये दिसत राहिलात तर तुम्हाला मोठी ऑफर मिळण्याची शक्यता जास्त असते. पण केव्हाही काम करण्याची आणि प्रवासाची सवय ठेवा. मानधन घेत असलेल्या कामाव्यतिरिक्त अभिनेत्याने ऑडिशन, नेटवर्किंग आणि कौशल्ये विकसित करण्यासाठी वेळ दिला पाहिजे. अभिनेता किंवा अभिनेत्रीला करियरच्या सुरुवातीच्या टप्प्यात ४१,२५,७०० रुपये मानधन मिळण्याचा अंदाज असतो, तर करियरच्या मध्यावर ४२,०८,२१४ रुपये आणि करियरच्या एक अनुभवी टप्प्यावर तब्बल १,५८,४२,६८८ रुपयांपर्यंत मानधन मिळण्याची शक्यता असते.

## संभाव्य करियरच्या संधी




अनेकांचे अभिनेता किंवा अभिनेत्री बनण्याचे स्वप्न पूर्ण होत नाही. त्यामुळे रुपेरी पडद्यापासून दूर होत, नामांकित नाटकामध्ये भूमिका साकारण्याचे स्वप्न बाजूला ठेवले तर इतरही करियरच्या संधी शोधल्या पाहिजेत. नवोदित कलाकार कदाचित क्रूझ लाइनवर किंवा थीम पार्कमध्ये, प्रादेशिक जाहिरातींमध्ये किंवा ऐतिहासिक री-एनेक्टर म्हणून काम करू शकतात. जाणून घेऊन करियरच्या संभाव्य संधी...

- व्हॉईस ॲक्टर : जाहिराती, व्हिडिओ गेम्स, ॲनिमेटेड सीरिज किंवा फीचर फिल्म्ससाठी व्हॉइस ॲक्टर म्हणून काम करू शकता.
- दिग्दर्शक : लिहिलेली स्क्रिप्ट पडद्यावर जिवंत करण्याची जबाबदारी दिग्दर्शकाची असते. या क्षेत्रातील योग्य कौशल्य तुमच्याकडे असल्यास त्यात करियरची संधी आहे. कास्टिंग, स्क्रिप्ट सर्व गोष्टी व्यवस्थितरित्या हाताळाव्या लागतात. तसेच बजेटमध्ये सर्व गोष्टी बसवाव्या लागतात.
- निर्माता : निर्माता कोणताही चित्रपट, टेलिव्हिजन शो, जाहिराती आणि स्टेज प्रॉडक्शनमधील सर्जनशील प्रक्रियेचे व्यवस्थापन आणि देखरेख करतात. अनेकदा निर्माते नेटवर्क किंवा प्रोडक्शन कंपनीसाठी काम करतात, परंतु बरेच जण फ्रीलान्स किंवा कॉन्ट्रॅक्ट बेसवरही काम करतात. निर्मात्यावर बजेट सेट करण्यापासून ते क्रू मेंबर्स सांभळण्याची जबाबदारी असते.
- एस्क्ट्रा : केवळ फिल्म, मालिकांमध्येच नाही तर जाहिरात, रिॲलिटी शो आणि काही मोठ्या शोमध्ये गेस्ट म्हणूनही कामाच्या संधी असतात. यातूनही वेगळी इन्कम मिळवता येते.

## कोणत्या गोष्टींची गरज ?

या क्षेत्रात इतर क्षेत्राप्रमाणे शिक्षणाची कोणतीही अट नाही, मात्र तुम्हाला या क्षेत्रात योग्य पद्धतीने करियर करायचेच असेल तर मात्र शिक्षण आवश्यक आहे. अनेक लहान मोठ्या ॲक्टिंग अकॅडमीमध्ये जाऊन अभिनयाचे शिक्षण घेऊ शकता, तर महाविद्यालयीत जीवनात थिएटर, एकांकिका करत या क्षेत्रात पाऊल ठेवता येते. मात्र तुम्हाला अभिनयाची तितकी आवड पाहिजे. मात्र एक अभिनेत्री, अभिनेता होण्यासाठी आवश्यक कौशल्ये मिळविण्यासाठी कोणती पाऊलं टाकली पाहिजेत, हे जाणून घ्या...

- अभिनयाचे क्लासेस लावा, महाविद्यालयातील ड्रामा क्लबमध्ये सहभागी व्हा. छोट्या-मोठ्या नाटकांमध्ये सहभाग घ्या.
- बॅचलर पदवी मिळवा, एक चांगला अभिनेत्री, अभिनेता होण्यासाठी शिक्षणाची गरज नसते. पण यात जर औपचारिक शिक्षण घ्यायचे असल्यास बॅचरल डिग्री असावी लागते.
- ऑडिशन आणि कौशल्ये विकसित करा, सिलेक्शन होणार नाही असे वाटत असले तरी वेगवेगळ्या सिनेमा, नाटक, जाहिरांसाठी ऑडिशन देत रहा. यामुळे तुम्हाला एक आत्मविश्वास येईल, अनुभव मिळेल, ओळखी वाढतील.
- मास्टर्स प्रोग्रामचा विचार करा, कधी मोठ्या शो किंवा प्रोग्राममध्ये छोटा रोल करण्याची संधी मिळाली तर ती सोडू नका. याच शोमधून कधी नशीब उजळेल सांगता येत नाही.
- एक चांगला एजंट शोधा, या क्षेत्रात काम करण्यासाठी एजंटची गरजचं असते असे नाही. पण एजंटमुळे अनेक व्यावसायिक संधी मिळतात किंवा माहित नसलेल्या गोष्टी त्यांच्याकडून चांगल्याप्रकारे समजून घेता येतात.

# कल अन् क्षमता ओळखूनच ‘कम्प्युटर’ क्षेत्रात ठेवा पाऊल!

**कम्प्युटर क्षेत्रांत विविध संधी उपलब्ध आहेत. विविध क्षेत्रांसाठी आवश्यक असणाऱ्या प्रणाली विकसित करणे, त्याचे व्यवस्थापन करणे यासाठी कुशल मनुष्यबळाची गरज आहे. दिवसेंदिवस ती वाढणार आहे हे निश्चित. मात्र, या क्षेत्रात येताना विद्यार्थ्यांनी आपली आवड, कल आणि कुवत ओळखून अभ्यासक्रम निवडणे गरजेचे आहे.**



दहावीनंतर कम्प्युटर क्षेत्रांतील करिअरचे पर्याय...

सध्याच्या कम्प्युटर, माहिती तंत्रज्ञान व माहिती दळणवळण तंत्रज्ञानाच्या युगात सर्वांना कम्प्युटरचे ज्ञान आवश्यक आहे. अनेक पालकांना आपले पाल्य मोबाइल किंवा कम्प्युटर उत्तम हाताळतो, त्यातील गेम्स, ॲप्लिकेशन्स त्यांना येतात म्हणजे मुलाचा कल कम्प्युटरकडे आहे, असा समज करून घेतात. मात्र, खरे म्हणजे कम्प्युटर आणि त्यातील विविध प्रणाली वापरणे किंवा हाताळणे याचा अर्थ कम्प्युटर क्षेत्रांत उत्तम करिअर करता येईल, असा होत नाही. कम्प्युटर, माहिती तंत्रज्ञान व माहिती दळणवळण तंत्रज्ञानाच्या युगात कम्प्युटर वापरण्याचे व हाताळण्याचे ज्ञान सर्वांनी घेणे हे क्रमप्राप्त झाले आहे. हे ज्ञान मिळविण्यासाठी महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेडच्या (एमकेसीएल) माध्यमातून एमएस सीआयटी हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. हा अभ्यासक्रम केल्यानंतर ॲडव्हान्स डिप्लोमाचे पर्याय खुला आहे. महाराष्ट्र सरकारने या अभ्यासक्रमांना मान्यता दिली असून, सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना तसेच नव्याने सेवेत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना हा अभ्यासक्रम पूर्ण करणे सक्तीचे केले आहे. एमएस सीआयटी अभ्यासक्रम केल्यास कम्प्युटरचे बेसिक ज्ञान, ऑपरेटिंग सिस्टीम, मायक्रोसॉफ्ट ऑफिसमधील एमएस वर्ड, एम एस एक्सेल, एमएस पॉवर पॉइंट आदी प्रणालींचा अभ्यास होतो. सर्चिंग, ब्राउझिंग, ई-मेल करणे यासाठी इंटरनेट कसे वापरावे, इंटरनेट कसे हाताळावे हे समजते. दहावीच्या सुट्टीत हा अभ्यासक्रम करणे सोयीचे ठरते. सरकारमान्य कम्प्युटर प्रशिक्षण केंद्रांत या अभ्यासक्रमाची परीक्षा ऑनलाइन घेण्यात येते. त्यानंतर परीक्षा पूर्ण केल्यावर सर्टिफिकेट मिळते. सरकारी आणि खासगी क्षेत्रांत नोकरी करताना हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाते.

### बारावीनंतरच्या संधी

- विज्ञान शाखेतून बारावी केल्यास विद्यार्थ्यांना बीई कम्प्युटर इंजिनीअरिंग, बीई इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, बीएस्सी कम्प्युटर सायन्स, बीएस्सी ॲनिमेशन, बीसीए सायन्स असे पर्याय उपलब्ध आहेत.
- प्रवेशासाठी महत्त्वाचे - कम्प्युटर सायन्स आणि गणित या विषयांचा जवळचा संबंध आहे. पाल्याची ॲनालॅटिकल ॲबिलिटी, लॉजिकल रिझनिंग यातील गती लक्षात घेऊन अभ्यासक्रम निवडावा.
- बीएस्सी ॲनिमेशन : यामध्ये विद्यार्थ्यांना जाहिरात, मोबाइल गेम्स, ॲप्स ई-लर्निंग या क्षेत्रांत संधी आहेत.
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात हे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.
- इंजिनीअरिंगचे शुल्क महाविद्यालयानुसार ठरते. हे शुल्क सरकारची शुल्क निर्धारण समिती ठरवते.


- डिप्लोमा इन कम्प्युटर इंजिनीअरिंग किंवा डिप्लोमा इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी
- कालावधी : तीन वर्षे.
- प्रवेश प्रक्रिया : डिपार्टमेंट ऑफ टेक्निकल एज्युकेशनतर्फे (डीटीई) केंद्रीय पद्धतीद्वारे.
- प्रवेशासाठी महत्त्वाचे : दहावीत ७० टक्के किंवा अधिक गुण असल्यास चांगल्या कॉलेजात प्रवेश मिळू शकतो. डिप्लोमा झाल्यावर बीई अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात प्रवेश मिळू शकतो. मात्र, ही प्रवेशसंख्या बीईच्या प्रथम वर्षाच्या निकालावरून ठरते. त्यामुळे काही वेळेला डिप्लोमाला चांगले मार्क मिळूनही पसंतीचे किंवा आवडीचे कॉलेज मिळेलच असे नाही. अशा वेळी काही विद्यार्थी पुन्हा प्रथम वर्ष बीईला प्रवेश घेतात. त्यात एक वर्षाचा कालावधी वाया जातो. डिप्लोमा केल्यानंतर बीएस्सी कम्प्युटर, बीसीए हा पर्यायही उपलब्ध आहे.

### कॉमर्सच्या विद्यार्थ्यांसाठी कम्प्युटरमधील करिअर

- बीबीए (कम्प्युटर ॲप्लिकेशन) : कॉमर्सच्या विद्यार्थ्यांना कम्प्युटरमध्ये करिअर करण्यासाठी हा उत्तम पर्याय आहे.
- एमसीए अभ्यासक्रम तीन वर्षांचा आहे.

### उच्चशिक्षण

बीई कम्प्युटर किंवा आयटी केल्यानंतर एमई, एमएस, एमएस्सी कम्प्युटर हे पर्याय आहेत. शिवाय एमबीए (सिस्टीम्स) करता येते. या अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्षांचा आहे. सर्व अभ्यासक्रमांमध्ये पदव्युत्तर शिक्षण उपलब्ध आहेत. संशोधनात रस असणाऱ्या विद्यार्थ्यांना पीएच.डी. करून संशोधनक्षेत्रात जाण्याचा पर्यायही खुला आहे.



# शिक्षण आणि नोकरी एकत्र करताना...

**नोकरी सोबतच तुम्ही कोणत्याही स्पर्धा परीक्षेची किंवा इतर कोणत्याही परीक्षेची तयारी करत असाल तर त्याची तयारी नीट आणि पूर्ण मेहनत घेऊन करावी लागते. पण नोकरीसोबतच अभ्यास सांभाळणे तुमच्यासाठी खूप अवघड होऊन बसते. या लेखात तुम्हाला अशाच काही टिप्स दिल्या आहेत. जेणेकरून नोकरीसोबतच तुम्हाला अभ्यासही सहज करता येईल.**

अनेक विद्यार्थी स्वावलंबी जीवन जगण्यासाठी अभ्यासासोबत नोकरी देखील करतात. काहींना आर्थिक परिस्थितीमुळे नोकरी करणे अनिवार्य असते, तर काहीजण नोकरीसोबत स्पर्धा परीक्षांची तयारी देखील करित असतात. अशा विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी काही टिप्स फॉलो करणे आवश्यक असते.



### मन सकारात्मक ठेवा

अभ्यास करताना तुमचे संपूर्ण लक्ष अभ्यासावर केंद्रित केले पाहिजे. असे केल्याने तुमच्या मनात आत्मविश्वासही टिकून राहतो. यासोबतच तुमच्या मनात फक्त सकारात्मक विचार ठेवा. जर तुम्ही जास्त नकारात्मक विचार केलात तर तुमच्या अभ्यासाचाही त्यामुळे खूप त्रास होतो. यासाठी सकारात्मक विचारांनीच अभ्यास करावा.

### ऑनलाइन कोचिंग

कामानंतर संध्याकाळी तुम्ही ऑनलाइन कोचिंग करू शकता. याच्या मदतीने तुमच्याकडे नोट्सही असतील आणि तुम्ही ठरलेल्या वेळेत अभ्यास करू शकाल. याशिवाय वरिष्ठांच्या मदतीने तुम्ही तुमचा अभ्यासही करू शकता. तुम्ही तुमच्या वरिष्ठांकडून मार्गदर्शन देखील घेऊ शकता जेणेकरून तुम्हाला अभ्यास करणे सोपे जाईल.

### वेळापत्रक तयार करा

लहानपणी जसे तुम्ही शाळेचे टाइम टेबल बनवले असेल त्याचप्रमाणे तुम्ही तुमचा आताचा वेळ विभागला पाहिजे. तरच तुम्ही तुमच्या अभ्यासाला वेळ देऊ शकता. यासाठी दिवसभरातील काही तास अभ्यासासाठी काढावे लागतील. असे केल्याने दिवसभरात तुमचा किती वेळ शिल्लक आहे, ज्याचा तुम्ही अभ्यासासाठी उपयोग करू शकता, हे तुमच्या लक्षात येईल. तसेच या वेळापत्रकात तुम्ही कठीण विषयांसाठी वेळ बाजूला ठेवू शकता.

### परीक्षेचा पॅटर्न समजून घ्या

तुम्ही कोणत्याही स्पर्धात्मक परीक्षेचा अभ्यास करत असाल तर त्यासाठी परीक्षेची तयारी करण्यापूर्वी तुम्हाला त्याची परीक्षा पद्धत समजून घ्यावी लागेल. तसेच, नोकरीसोबत काही तास काढून सुमारे चार ते पाच तास मन लावून तयारी करावी लागेल. जर तुम्ही एखाद्या कोर्सला प्रवेश घेण्यासाठी अभ्यास करत असाल तर त्यासाठीही तुम्ही वेळापत्रक बनवा आणि अभ्यासाला सुरुवात करा.



## शॉर्ट न्यूज

### माजी सरपंचाकडून महिलेला त्रास

**राहाता :** तालुक्यातील पिंपरी निर्मळ येथील शेतात कामासाठी जाणाऱ्या महिलेला मोटारसायकल आडवी लावून वारंवार त्रास देणाऱ्या पिंपरी निर्मळ येथील माजी सरपंच व राहाता पंचायत समितीचे माजी सदस्य नानासाहेब निर्मळ विरोधात लोणी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी लोणी पोलीस ठाण्यात भादंवि कलम ३४१ अन्वये येथील माजी सरपंच नानासाहेब त्रिंबक निर्मळ याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली जोसेफ साळवे करत आहेत.

### महापुरुषांच्या विचारावर चालणारी संस्था

**खर्डा :** ग्रामीण विकास केंद्र हे महापुरुषांच्या विचारावर चालणारी संस्था असल्याचे प्रतिपादन पोलीस निरीक्षक विजय झंजाड यांनी व्यक्त केले. ते राजश्री छत्रपती शाहू महाराजांची जयंती खर्डा येथे पार पडली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष रवी सुरवसे, दिवटे गुरुजी पत्रकार दत्तराज पवार धनसिंग साळुंखे पोलीस कॉन्स्टेबल बडे, ग्रामीण विकास केंद्राचे विशाल पवार डॉक्टर बिपिनचंद्र लाड इत्यादी उपस्थित होते.

### अशोकच्या उपाध्यक्षपदी हिम्मत धुमाळ

**श्रीरामपूर :** अशोक सहकारी साखर कारखान्याच्या उपाध्यक्षपदी हिम्मत माधवराव धुमाळ यांची बिनविरोध निवड झाली. कारखान्याचे उपाध्यक्ष पुंजाहरी शिंदे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने सदर पदासाठी निवडणूक अधिकारी प्रादेशिक सहसंचालक (साखर) अहमदनगर गणेश पुरी यांचे अध्यक्षतेखाली कारखान्याच्या सभागृहात बैठक पार पडली. निवडीप्रसंगी उपाध्यक्ष पदासाठी हिम्मत धुमाळ यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली. यावेळी बाबासाहेब कडुजी आदिक यांचे सूचनेस आदिनाथ निवृत्ती झुराळे यांनी अनुमोदन दिले.

### आरोग्य तपासणी शिबीर उत्साहात

**संगमनेर :** पोखरी हवेली येथे जयहिंद लोकचळवळीच्या माध्यमातून सुदृढ ग्राम प्रकल्पांतर्गत आरोग्य तपासणी शिबीर उत्साहात संपन्न झाले. सुदृढ ग्राम प्रकल्पाच्या अनुषंगाने सुदृढ आरोग्यही तितकेच महत्त्वाचे असल्याने महिला बचत गटाच्या महिला, शेतकरी, युवक, युवती, शालेय विद्यार्थी यांनी आरोग्य तपासणीच्या माध्यमातून हेल्थ कार्ड बनवून घेतले. तसेच ज्या नागरिकांना आजार आढळून आले त्यांना योग्य ते मार्गदर्शन वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून करण्यात आले. पुरुष, महिला व मुलींच्या रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाणही तपासण्यात आले.

### वाळू वाहतूक करणारा हायवा पकडला

**अकोले :** गोदावरी नदी पात्रातून वाळूचा बेकायदेशीर उपसा करून अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा पोलिसांनी पकडला. वाळूसह जप्त केलेला मुद्देमाल २० लाख ३० हजार रुपयांचा आहे. हायवा चालक सचिन प्रकाश पवार (रा. वाकत, ता. निफाड, जि. नाशिक) यास विचारपूस केली असता, त्याच्याजवळ वाळू संदर्भात कोणतीही पावती आढळून आली नाही. त्यामुळे पोलिसांनी २० लाख रुपयांचा हायवा व ३० हजार रुपये किमतीची वाळू जप्त केली आहे. पोलिस नाईक रामचंद्र साळुंखे यांच्या फिर्यादीवरून चालक सचिन पवार याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जिल्ह्यातील ३३ कृषी सेवा केंद्राचे परवाने निलंबित

**■ जिल्हा कृषी अधिकारी सुधाकर बोराळेंची माहिती ■ ५० कृषी सेवा केंद्र चालकांना नोटीसा**

**नगर : प्रतिनिधी**




**खरीपाच्या चालू हंगामात चढ्या दराने कृषी निविष्ठांची विक्री, लिंकिंग, मुदतबाह्य बियाणे व खतांची विक्री आदींसह विविध कारणाने कृषी विभागाच्या भरारी पथकाच्या तपासणीत त्रुटी आढळलेल्या जिल्ह्यातील ३३ कृषी सेवा केंद्राचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. दरम्यान, चालू खरीप हंगामात नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कृषी सेवा केंद्रावर कारवाई चालूच राहणार आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी दिली.**

नगर जिल्ह्यात खरीप हंगामाच्या सुरुवातीपासून अनेक कृषी सेवा केंद्रात बियाणे व खते यांची चढ्या दराने विक्री सुरू होती. जिल्ह्यात चांगला पाऊस झाल्यानंतर शेतकऱ्यांनी खते व बियाणे खरेदीसाठी लगबग सुरू केली आहे. अनेक शेतकऱ्यांना कृषी सेवा केंद्र चालकांकडून चढ्या दराने कपासी बियाणे खरेदी करावी लागले. तसेच युरिया खताच्या बॅगवर इतर खते करण्याची सक्ती काही कृषी सेवा केंद्रात सुरू होती. बियाणे व खतांचा विक्रीत काळाबाजार सुरू होता. या संदर्भात अनेक शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे तक्रारी केल्या होत्या.

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवरच कृषी निविष्ठांचा विक्रीतील गैरप्रकार रोखण्यासाठी कृषी विभागाने जिल्ह्यातील १४ तालुके व जिल्हास्तरीय एक पथक अशा एकूण १५ भरारी पथकांची नियुक्ती केली. या प्रत्येक भरारी पथकात २ कृषी अधिकारी व ३ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. भरारी पथकांत एकूण ७५ जणांची नियुक्ती केली. चालू खरीप हंगामात आतापर्यंत कृषी विभागाने जिल्ह्यातील ३३ कृषी केंद्राचे परवाने निलंबित केले आहेत. यामध्ये खते व बियाणांचा साठा फलक न ठेवणे, नोंदवह्या अद्ययावत न ठेवणे, मुदतबाह्या कृषी निविष्ठांचा साठा, चढ्या दराने बियाणे व खतांची विक्री तसेच खते व बियाणासोबत लिंकिंग करून कृषी निविष्ठा करणाऱ्या कृषी केंद्र चालकांवर भरारी पथकाने कारवाई केली. तसेच ५० पेक्षा अधिक कृषी सेवा केंद्रांना नोटिसा देण्यात आल्या आहेत.

**गैरप्रकार आढळल्यास तक्रार करा**


बियाणे व खतांच्या विक्रीत गैरप्रकार आढळल्यास शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे अथवा ९८२२४४६६५५ राज्यस्तरीय व्हॉटअप नंबरवर तक्रार करावी. कृषी सेवा केंद्रांच्या तपासणीसाठी जिल्ह्यात १५ पथकांची नियुक्ती केली आहे. कृषी सेवा केंद्रावर नियमांचे उल्लंघन केल्याचे आढळल्या कारवाई करण्यात येईल, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले.

तालुकानिहाय केलेल्या कारवाया

कृषी विभागाच्या पथकाने जिल्ह्यातील ३३ कृषी सेवा केंद्र चालकांवर कारवाई करून परवाने निलंबित केले आहेत. यामध्ये शेवगाव ४, राहुरी ५, श्रीरामपूर १३, नेवासे ६, कर्जत ३, नगर तालुक्यातील ३ कृषी सेवा केंद्र चालकांचा समावेश आहे, अशी माहिती जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक राहुल ढगे यांनी दिली.

## वाचकांच्या लेखणीतून

# निळोबा अखेरचे संत?



**संत महिमा कोण जाणे सीमा।**
**सीणला ब्रह्मा बोलवेना।।**
**-संत नामदेव**

संत निळोबा हे आपल्या मराठी संतमंडळातले अखेरचे संत होत, असा वारंवार उल्लेख होतो. तो चुकीचा वाटतो.

जगात जेवढे संत आहेत; तेवढे आपल्या एकट्या भारतात आहेत. भारतात इतर राज्यांत मिळून जेवढे संत आहेत; तेवढे एकट्या महाराष्ट्र राज्यात आहेत, असे मी म्हणत असतो. सारांश, आपल्या इकडे संतमहिमा अपार आहे. आपल्या संत परंपरेला अंत नाही.

आपल्याकडे गोरोबा, नामदेव, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, निळोबा अशी अखंड संत परंपरा चालत आलेली आहे. पुढेही चालूच राहील. संत सान्त (ज्याला अंत आहे असे) नाहीत. या संत परंपरेतील निळोबा हे अंतीम संत नव्हेत! अलिकडील काळातील धुंडामहाराज देगलूरकर, मामासाहेब दांडेकर, बाबा महाराज सातारकर कोण होते? हल्ली ठीकठिकाणी हरिनाम सप्ताह साजरे होतात. त्यांत कीर्तने कोण करतात? ह.भ.प.चंद्रशेखर महाराज देगलूरकर, शिवलीलाताई पाटील, रोहिणीताई परांजपे ही कीर्तनकार मंडळी कोण आहेत? होय. संत परंपरा पुढे चालविणारी संतमंडळीच आहेत ती! यात संत निळोबांचा अवमान नसून आपल्या संत परंपरेचा गौरवच आहे!

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

# अजित पवार आमच्या बोकांडी बसलेत ! त्यांना महायुतीतून बाहेर काढा

**मुंबई: प्रतिनिधी**

**अजित पवार महायुतीत उशिरा यायला हवे होते, असे विधान करून शिवसेना नेते रामदास कदम यांनी महायुतीमधील बेबनाव समोर आणला. त्यानंतर आता अजित पवार यांचा महायुतीतील सहभाग भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांना देखील खटकायला लागला आहे. भाजपचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष आणि पुणे बाजार समितीचे संचालक सुदर्शन चौधरी यांनी भाजप आमदार राहुल कुल यांच्यासमोरच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. ज्या भाजप कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांना अजित पवार यांनी अक्षरश: चिरडले, त्याच अजित पवारांना आमच्या बोकांडी बसवलेय, अशा शब्दात आपला संताप व्यक्त करत अजित पवार असतील तर असली सत्ता आपल्याला नको, अशा टोकाच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या.**

अजित पवार यांच्या महायुतीतील सहभागाने भाजपचे स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते पदाधिकारी नाराज असल्याचे बोलले जाते. अजित पवार जर सत्तेत असतील तर भाजप वाढायला मर्यादा येतील, अशीही त्यांच्या मनात भावना असते. अशाच प्रकारच्या संतप्त भावना भाजपचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष सुदर्शन चौधरी यांनी व्यक्त केल्या.

**ते दोघे मंत्री झाले असते पण...**

अजित पवार यांनी राहुल कुल, योगेश टिळेकर यांच्यावर अन्याय केलाय. नाहीतर आता हे दोघेही मंत्री झाले असते. अनेक लोकांना महामंडळ मिळाले असते. आमचे आबासाहेब सोनावणे आणि श्याम गावडे अजित पवार यांच्याकडे निधी मागायला गेले तर तुमचा काय संबंध, १० टक्के निधी देऊ, असे ते म्हणाले. अरे असली सत्ता आपल्याला कशाला हवीये, अशा उद्विग्न भावना त्यांनी व्यक्त केल्या. राष्ट्रवादीचा टोकाचा विरोध केला, त्यांनाच सोबत घेतले



पुण्याचे पालकमंत्री बनवून त्यांना आमच्या बोकांडी बसवले आहे. त्यांनी आदेश द्यायचे आणि आम्ही ते फॉलो करायचे, अशी आमची अस्वस्था आहे. अनेक वर्षे आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विरोध करतोय, त्याच राष्ट्रवादीला कशासाठी सोबत घेतले आहे? असा सवाल करीत भाजपचे कार्यकर्ते भीतीच्या वातावरणात आहेत. तुम्ही पुढील निर्णय लवकरात लवकर घेऊन अजितदादांना महायुतीबाहेर काढा, असे सुदर्शन चौधरी म्हणाले.

**आम्ही काय अजितदादांसाठी सत्ता आणायची का?**

कार्यकर्त्यांचे मन काय सांगतेय हे ऐकून जर निर्णय घेणार असाल, तर अजित दादांना महायुतीतून बाहेर काढा. त्यांनी आजवर भाजप नेते आणि कार्यकर्त्यांवर अन्याय केला आहे. आमच्या अनेक लोकांना महामंडळ भेटले असते मंत्री झाले असते. अजित पवार जर आमच्यासोबत राहणार असतील तर अशी सत्ताच आम्हा भाजप कार्यकर्त्यांना नको. पुणे जिल्हा आणि सोलापूर जिल्ह्याची सारखीच परिस्थिती आहे. स्वाभिमानी नेतृत्व पुणे जिल्ह्याला मिळत नाही. लोकांचे हाल झालेले आहेत. गेले दहा-दहा वर्ष झाले आम्ही त्यांच्याशी दोन हात करत आहोत मात्र आता त्यांच्यासोबतच हात मिळवणे यात काय अर्थ आहे?

भाजपच्या बूथ लेवल पासून जिल्हा पातळीवरच्या प्रत्येक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की अजित पवार नकोत. आम्ही काय अजितदादांसाठी सत्ता आणायची का? पालकमंत्री होऊन त्यांनी बॉस व्हायचं आणि भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्त्यांना भरडण्याचे काम होणार असेल तर सत्ता आम्हाला नको. आमच्या लोकांना आमदार होऊ द्या, त्यांनी पक्ष वाढवला आहे. आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना बळ दिलं आहे.

(पान १ वरून)

### टक्केवारी सरकार, चोर सरकार !

घोषणा लिहिलेले फलक हाती घेत टक्केवारी सरकार हाय हाय, शेतकऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे, शेतकऱ्यांची कर्जमाफी झालीच पाहिजे, शेतकऱ्यांचे वीज बिल माफ झालेच पाहिजे.अशी जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन केले. या सरकारने शेतकऱ्यांना फसवलं आहे. शेतकऱ्यांना अनुदान दिलं नाही, कर्ज मुक्ती झाली पाहिजे, अशी मागणी अंबादास दानवे यांनी यावेळी केली.

**विरोधकांच्या घोषणा काय?**

कृषी मंत्र्यांच्या जिल्ह्यातच बळीराजाचा बळी जात आहे. मंत्री सुखी, शेतकरी दु:खी, टक्केवारी सरकार, चोर सरकार आणि ४० टक्के सरकार हाय हाय अशा घोषणा यावेळी विरोधकांनी दिल्या. त्यामुळे संपूर्ण विधानभवन परिसर दणाणून गेला.

**उद्धव ठाकरे येताच पेढे वाटप**

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे आज विधानभवनात आले. उद्धव ठाकरे विधानभवन परिसरात येताच विरोधकांनी जोरदार टाळ्या वाजवल्या. अंबादास दानवे आणि शिवसैनिकांनी पेढे वाटप केले. उद्धव ठाकरे गटाने लोकसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळवले आहे. त्यामुळे विरोधकांनी पेढे वाटून आनंद साजरा केला.









# माधवीची हरियानाच्या एनआयटीमध्ये बी टेक साठी निवड!

■ राळेगणसिध्दीच्या डी बी एम स्कुलच्या शिरपेचात मानाचा तुरा
■ माधवीचा प्रवास विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी

राळेगणसिध्दी : प्रतिनिधी

**१६ वर्षांच्या निरंतर, निष्ठावान सेवेने उभ्या राहिलेल्या डी बी एम स्कुलच्या वटवृक्षाचे कौतुक आता सर्वत्र होऊ लागले आहे. या स्कुलच्या दुसऱ्या बॅचची माजी विद्यार्थीनी माधवी विष्णू चिपाडे हिची कुरूक्षेत्र, हरियाना येथील एन आय टी येथे पहिल्या फेरीमध्ये बी टेकच्या अभ्यासक्रमासाठी निवड झाली असून तिच्या या यशामुळे डी बी एम च्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.**




सन २०२१ च्या बॅचची माधवी चिपाडे हीची बी टेक साठी निवड झाल्यानंतर तिने अचानक आपल्या स्कुलमध्ये आली. एक महिन्यांच्या सुटीच्या कालावधीत घरी आराम न करता आपल्या स्कुलमध्ये स्वेच्छेने सेवा करण्यास तिने सुरूवात केली.

माधवी हिच्या अचानक झालेल्या अगमनामुळे प्राचार्य जे. डी.मापारी यांनी आनंद व्यक्त केला. ते म्हणाले, आज माजी विद्यार्थ्यांचे संघ, असोसिएशन पहावयास मिळतात. स्नेह मेळावे पार पडतात. झुंडीने एकत्र येऊन लाखोंचे फंड उभारून शाळेची इमारत, क्रीडांगण, इतर साहित्य अशा अनेक बाबींचा विचार साकार होतो. पण प्रत्यक्ष आपली वेळ शाळेला द्यावी असे कोणालाही वाटत नाही. सर्वात अमुल्य असे काही असेल तर आपला वेळ, ज्ञान, कौशल्य आणि प्रेरक विचार देण्याची भावना. ती मात्र कुठे दिसत नाही. आज माधवीच्या रूपाने शाळेच्या संस्कारांची शिदोनी जणू माघारी आल्याची जाणीव होते. तिने शाळेमध्ये सेवा देण्याच्या इच्छेचे कौतुक आहे. माझ्या उडून गेलेल्या प्रत्येक पाखराने असा सन्मान मिळवावा अशी सदिच्छा व्यक्त करीत मापारी यांनी माधवी हिचा सन्मानचिन्ह देऊन सन्मान केला.

### ओले मुळ भेदी खडकाचे अंग..

**ओले मुळे भेदी खडकाचे अंग, अभ्यासाशी सांग कार्यसिध्दी या संत निळोबारायांच्या ओळी साक्षात जगणारे आजही काही लोक सापडतात. १६ जुन २००८ रोजी राळेगणसिध्दीमध्ये डीबीएम या संस्कारक्षम विचारांची निर्मिती झाली.१६ वर्षांच्या निरंतर, निष्ठावान सेवेमुळे निर्माण झालेला डीबीएमचा वटवृक्ष समोर दिसते ती अंगापिंडाने वाढलेली शाळेची इमारत. पण खरे पाहता या मातीत शिक्षण घेणाऱ्या मनात एका संस्काराची रूजवणूक होताना प्रत्यक्ष कोणाला अनुभूती घेता येते की नाही हे शब्दात मांडता येणे अशक्यच. पण शिस्त, क्षमता व कर्तव्य भावनेने प्रीत असे प्रथम शिक्षक, मुख्याध्यापक यांचे माझा प्रत्येक विद्यार्थी असा घडेल की तो आकाशाला गवसणी घालेल.**

जे.डी.मापारी
प्राचार्य
डी बी एम इंग्लिश मिडियम स्कुल, राळेगणसिध्दी

# चोंभूत सोसायटीचे आपलं सरकार सेवा केंद्र

छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीदिनी उद्घाटन

चोंभूत : प्रतिनिधी

**चोंभूत विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या वतीने छत्रपती शाहू महाराज जयंतीचे औचित्य साधून आपले सरकार सेवा केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.**


■ चोंभूत विविध कार्यकारी सेवा संस्थेच्या वतीने आपलं सरकार सेवा केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

बाजार समितीचे मा. सभापती गंगाधर शेळके, जिल्हा बँकेचे शाखाधिकारी आर. एस. घुमरे यांच्या उपस्थितीत उद्घाटन समारंभ तसेच छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रम संपन्न झाला. छत्रपती शाहूंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून यावेळी अभिवादन करण्यात आले.

यावेळी सेवा सोसायटीचे चेअरमन दत्तात्रेय कोल्हे, म्हस्केवाडी सोसायटीचे चेअरमन शिवाजी म्हस्के, रेनवडी सोसायटीचे चेअरमन भगवान डेरे, बाळू नाना मेहेर, मा. व्हा. चेअरमन गेनभाऊ मेहेर, मा. उपसरपंच बाळासाहेब मेहेर, रामदास पारखे, शिरतार गुरूजी, संपत घोलप, संपत घोलप, बाळू खंडू मेहेर, रंगनाथ मेहेर, ग्रामपंचायत सदस्य प्रणल भालेराव, संदीप पाडेकर, साहेबराव घोलप, देविदास दरेकर, शिवाजी दरेकर, अशोक घोलप, रामदास कोल्हे, बबनराव कोल्हे, नितिन घोलप, रावसाहेब माळी, तात्याभाऊ माळी, मंगेश भालेराव, रंगनाथ अल्हाट, सचिव सिनारे, वाफारे, साबळे, सोगावी, कनिंग्ध्वज यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. प्रणल भालेराव यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले तर चेअरमन दत्तात्रेय कोल्हे यांनी आभार मानले.

### सेवा उपलब्ध झाल्याचा आनंद

**आपले सरकार सेवा केंद्र चोंभूत सोसायटीच्या वतीने सुरू करण्यात आल्याने गावातील शेतकरी वर्गाला उतारे, विमा दाखले काढण्यासाठी धावपळ करण्याची गरज भासणार नाही. गावातच सेवा उपलब्ध झाल्याचा आनंद आहे.**

गंगाधर शेळके
मा. सभापती, कृ. उ. बा. स. पारनेर

### शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन

**शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त शासकीय योजनांचा लाभ घ्यावा. पीक विमा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी भरावा. विमा हे एक प्रकारे शेतकऱ्यांसाठी संरक्षण कवच असून दुष्काळ किंवा अतिवृष्टी झाली तर सरकारकडून शेतकऱ्यांना मदत करण्यात येते.**

आर. एस.घुमरे
शाखाधिकारी, जिल्हा बँक

# छत्रपती शाहू महाराजांचे कार्य तेजस्वी- प्रा. विशाल रोकडे



अळकुटी : प्रतिनिधी

**छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची न्याय, समता, बंधूता, स्वातंत्रय या मुल्यांचा स्विकार करून करवीर संस्थानात स्वातंत्रयपूर्व लोकशाहीची मुलतत्वे समाजात प्रसृत केली व चिरंतन टिकविली असे सांगतनाच छत्रपती शाहू महाराजांचे कार्य तेजस्वी असल्याचे प्रतिपादन प्रा. विशाल रोकडे यांनी केले.**

प्रवरा शिक्षण संस्थेच्या अळकुटी येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयामध्ये छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची १५० वी जयंती तसेच सामाजिक न्याय दिन, अंमली पदार्थ सेवन विरोधी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी छत्रपती शाहूंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा. विशाल रोकडे यांचे विशेष व्याख्यान पार पडले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पारखे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. उपप्राचार्य प्रा. अर्जुन चाटे यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले.

यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. रोकडे म्हणाले, भारतीय समाज जीवनास एक वैचारिक अधिष्ठान देण्याचे कार्य छत्रपती शाहू महाराजांनी केले. अस्पृश्यता निवारण, आंमली पदार्थ विरूध्द जनजागृती, शिक्षण प्रसार, स्त्री-पुरूष उध्दाराचे कार्य आदींद्वारे त्यांनी समाजामध्ये सलोखा निर्माण केला. त्यांच्या या अलौकिक कार्याचा गौरव म्हणून महाराष्ट्र शासनाने त्यांचा जन्मदिन हा सामाजिक न्याय दिन म्हणून सन २००६ पासून साजरा करण्यास सुरूवात केली. एकुणच छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचा जन्मदिन हा सामाजिक न्याय दिन रूपाने संबंध महाराष्ट्र उत्सव म्हणूनच साजरा करतो असे इतिहास विभाग प्रमुख प्रा. विशाल रोकडे यांनी सांगितले.

यावेळी महाविद्यालयाच्या सर्व विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. सांस्कृतीक विभाग प्रमुख प्रा. स्वाती फापाळे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले तर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख प्रा. संजय जाधव यांनी आभार मानले.

# विशेष योग्यता श्रेणीसह साक्षीला आर्किटेक्चरची पदवी!

साक्षी तनपुरेचा मळगंगा ट्रस्टकडून सत्कार



निघोज : प्रतिनिधी

**निघोज येथील साक्षी सुनील तनपुरे हिने विशेष योग्यता श्रेणीमध्ये आर्किटेक्चर ही पदवी प्राप्त करून आपल्या कुटूंबाचे स्वप्न पुर्ण केले. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या वतीने तीचा रूपेश ढवण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

यावेळी ट्रस्टचे सचिव शांताराम कळसकर, विश्वास शेटे, सोमनाथ वरखडे, बबनराव ससाणे, विठ्ठल कवाद, सविता तनपुरे, ठकराम लंके, बाबाजी तनपुरे, प्रा. बबनराव सोनवणे, निवृत्तीमहाराज तनपुरे, सुनील तनपुरे आदी उपस्थित होते.
यावेळी बोलताना शांताराम कळसकर म्हणाले, तनपुरे कुटूंब धार्मिक, अध्यात्मिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य आहे. जिल्हा परिषदेची शाळा ते माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेताना साक्षी हिने हुशार विद्यार्थीनी म्हणून नावलौकीक मिळविला होता. आर्किटेक्चरची पदवी मिळवितानाही तिने आपला लौकीक कायम राखल्याचे गौरवोद्गार कळसकर यांनी काढले.

प्रवचन, किर्तनाच्या माध्यमातून सतत कार्यरत असले, धार्मिक संस्कृतीचा पाठपुरावा करणारे निवृत्ती महाराज तनपुरे यांची साक्षी ही नात असून डॉ. बाळासाहेब तनपुरे यांची पुतणी आहे. तिचे वडील नगर शहरात बांधकाम व्यवसायात कार्यरत आहेत. युवा नेते रूपेश ढवण यांनी साक्षीला शुभेच्छा दिल्या.

# एकल महिलांना प्रवाहात आणण्यासाठी रोकडे यांचा पुढाकार

केशर आंब्याचे रोप तसेच गृहउपयोगी वस्तू भेट देत सन्मान

सुपा : प्रतिनिधी

**विधवा महिलांमधील एकटेपणाची भावना दुर करून त्यांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी सुप्याच्या सरपंच मनिषा रोकडे यांनी पुढाकार घेतला असून त्यांना एकत्रीत करून केशर आंब्याचे रोप तसेच गृहउपयोगी वस्तू भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.**




सरपंच मनिषा रोकडे यांच्या संकल्पनेतून सुपा ग्रामपंचायत तसेच चैतन्य संस्थेकडून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विधवा भगिनींच्या हस्ते दिप प्रज्वलन करून या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. चैतन्य संस्थेच्या वतीने महिलांचे स्वागत करण्यात येऊन या कार्यक्रमामागील हेतू सरपंच रोकडे यांनी विषद केला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार मार्तंडराव बुचूडे यांनी सरपंच मनिषा रोकडे यांच्या संकल्पनेतून सुपा ग्रामपंचायत व चैतन्य संस्थेने हाती घेतलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले. विधवा महिलांनी आपली बाजू कमकुवत आहे म्हणून खचून न जाता परिस्थितीशी दोन हात करण्याचे आवाहन बुचूडे यांनी केले.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार शिवाजी पानमंद, ग्रामपंचायतच्या महिला सदस्या, चैतन्य संस्थेच्या पदाधिकारी तसेच कर्मचारी, सुपा ग्रामपंचायतीचे कर्मचारी, आरोग्य कर्मचारी यांच्यासह शेकडो महिला उपस्थित होत्या.

**स्त्रीचा वैवाहिक दर्जा काय आहे, यावर तिचा सन्मान ठरविण्यापेक्षा सर्वप्रथम स्त्रीला एक माणूस म्हणून तिचे अधिकार मान्य करणे आवश्यक आहे. भारतीय राज्यघटनेतील तत्वे संपूर्ण समाजाने अंगिकारणे अपेक्षित आहे. केवळ विधवा महिला म्हणून नव्हे तर सर्वच महिलांच्या प्रति समाजात सन्मान मिळाला पाहजे यासाठी काम करणे आवश्यक आहे. समाजामध्ये आता जागृती होते असून विधवा प्रथा बंदीचे ठराव गावोगावी करण्यात आले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आम्ही एकल महिलांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी पुढाकार घेतला आहे.**

मनिषा योगेश रोकडे
सरपंच, सुपा

# सुप्यापाठोपाठ निघोज परिसरात ड्रोन सदृश उपकरणाच्या घिरट्या!

■ नागरीकांमध्ये भितीचे वातावरण ■ प्रशासनाने खुलासा करण्याची मागणी



निघोज : प्रतिनिधी

**निघोज, टाकळीहाजी परिसरात ड्रोन सदृश उपकरण घिरटया घालीत असून त्यामुळे नागरीकांमध्ये भितीचे वातावरण आहे. यापूर्वी सुपे परीसरात विशेषतः औद्योगिक क्षेत्रावर ड्रोन सदृश उपकरणाच्या घिरटया सुरू होत्या. या उपकरणासबंधी नागरीक अनभिज्ञ असून प्रशासाने त्याचा शोध घेऊन खुलासा करण्याची मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, या उपकरणाच्या घिरटयांमुळे नागरीकांमध्ये मात्र भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.**

स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार निघोज, शिरापूर, देवीभोयरे तसेच शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी परिसरात हे उपकरण गेल्या चार ते पाच दिवसांपासून घिरटया घालत आहे. जिल्हाधिकारी कार्यालय तसेच संबंधित विभागाने या प्रकाराकडे लक्ष देऊन त्यासंदर्भात खुलासा करणे आवश्यक असल्याचे नागरीकांचे म्हणणे आहे. हे उपकरण प्रशासनाच्या संमतीने घिरटया घालत असेल तर प्रशासनाकडून त्याबाबत प्रबोधन करून नागरीकांमध्ये निर्माण झालेली भीती दुर करणे गरजेचे आहे.

### रात्री दहा नंतर उपकरणांचा संचार !

**रात्री दहा नंतर चार ते पाच ड्रोन सदृश उपकरणे परीसरावर घिरटया घालीत असल्याचे पहावयास मिळाल्याचे शिरापूर येथील अंकुश वडने यांनी सांगितले. तर टाकळी हाजी येथील महिला बचत गटाच्या अध्यक्षा मनिषाताई बारहाते यांनी सांगितले की, बुधवार दि.२६ रोजी रात्री दहा नंतर ही उपकरणे आकाशात घिरटया घालत असल्याचे दिसले. निघोज परिसरातून ही उपकरणे शिरूर तालुक्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. यासंदर्भात आपण पुण्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधून माहीती देणार असल्याचे बारहाते यांनी सांगितले.**

### सुपे आणि श्रीगोंदे तालुक्यातही

**निघोज परिसरात ड्रोन सदृश उपकरणे फिरत असल्याचा प्रकार पुढे येण्यापूर्वी तालुक्यातील सुपे तसेच श्रीगोंदे तालुक्यातील वांगदरी, हंगेवाडी, लोणी व्यंकनाथ, शिरसगांव बोडखा या गावांमध्येही ड्रोन सदृश उपकरणे घिरटया घालीत असल्याचे नागरीकांच्या निदर्शनास आले होते. सुपे येथे औद्योगिक वसाहत असून तिथे मोठ मोठे उद्योग उभारण्यात आले आहेत. या पार्श्वभुमीवर प्रशासनाने या प्रकाराची गांभीर्याने दखल घेणे गरजेचे आहे.**

# पारनेरच्या विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड

■ पारनेर महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्हू ■ रसायनशास्त्र विभागाचा बहुमान



पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर शहरातील न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजच्या रसायनशास्त्र विभागातील आठ विद्यार्थ्यांची विविध आंतरराष्ट्रीय औषध निर्मिती कंपन्यांमध्ये कॅम्पस इंटरव्हूद्वारे निवड झाल्याची माहीती प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी दिली.**

डॉ. मतकर यांनी सांगितले की, विविध कॅम्पस इंटरव्हूच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यात येतात. आजवर महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी कॅम्पस इंटरव्हूच्या माध्यमातून नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीत रूजू झाले असून यंदाही हीच परंपरा कायम राखण्यात आली आहे. महाविद्यालयाचा प्लेसमेंट सेल व रसायनशास्त्र विभाग सातत्याने विविध नामांकित कंपन्यांच्या संपर्कात राहून तिथे उपलब्ध असलेल्या संधींची माहीती विद्यार्थ्यांना देत असतो. त्यातून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.

कॅम्पस इंटरव्हूच्या यशस्वी आयोजनासाठी अंतर्गत गुणवत्ता कक्ष समन्वयक डॉ. तुकाराम थोपटे, करिअर मार्गदर्शन व प्लेसमेंट समितीचे प्रमुख प्रा. सागर म्हस्के, रसायनशास्त्र विभागातील प्रा. डॉ. संभाजी काळे, डॉ. राहुल डिग्गीकर, प्रा. भाउसाहेब नरसाळे, प्रा. अनिल ढोले, प्रा. प्रविण डौले, प्रा. नवनाथ चेडे, प्रा. डॉ. सरीता कुंडलिकर, प्रा. अश्विनी ठुबे, प्रा. विद्या शेळके यांनी विशेष सहकार्य केले.

कॅम्पस इंटरव्हूद्वारे निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वास आठरे, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे यांच्यासह संस्थेचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर, उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे, अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे समन्वयक डॉ. तुकाराम थोपटे यांनी अभिनंदन केले.

### हे आहेत यशस्वी विद्यार्थी

**रसायनशास्त्र विभागातील सागर भोसले, राहुल गवते, राज राशिनकर, निकीता वाळुंज यांची मुंबई येथील कॅलेक्स केमिकल्स ॲण्ड फार्मासिटिकल या कंपनीत, प्रियंका चत्तर हिची पुणे येथील कैरव केमफोर्ब इंडस्ट्रिज इथे तर यश चेमटे, प्रियंका गुंजाळ यांची नवी मुंबई येथील विधी स्पेशल फुड इंटिगेटेड लिमिटेडमध्ये निवड झाल्याचे उपप्राचार्य तथा रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अनिल आठरे यांनी सांगितले.**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com